आदर्श आचारसंहितेसंदर्भात आयोगास पत्रव्यवहार सादर करताना घ्यावयाची दक्षता

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ -२०१७/सं.क्र. १४१/आचारसंहिता कक्ष,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २७ जानेवारी, २०१७.

वाचा:- राज्य निवडणूक आयोगाचे क्रमांक-रानिआ/२०१०/प्र.क्र.१५३/का-२,
दिनांक ५/१/२०११ चे परिपत्रक.

## परिपत्रक

राज्य निवडणूक आयोगाने दिनांक ११/१/२०१७ रोजी जाहीर केलेल्या सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमानुसार राज्यातील २५ जिल्हे व १० महानगरपालिका क्षेत्रामध्ये आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

२. या आदर्श आचारसंहितेपासून सूट देण्याबाबत शासनाच्या अनेक विभागांकडून अनेक विषयांवर प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाकडे प्राप्त होतात. या प्रस्तावांची छाननी केल्यावर खालील बाबी प्रकर्षाने दिसून आलेल्या आहेत :-

(i) राज्य निवडणूक आयोगाने आदर्श आचारसंहितेसंबंधातील दिनांक १४/१०/२०१६ रोजी निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे सदर प्रस्ताव आहे किंवा कसे, याबाबतची शहानिशा करण्यात येत नाही.

(ii) राज्य निवडणूक आयोगाने मा. मुख्य सचिवांना दिनांक १९/१/२०१६ रोजी पाठविलेल्या पत्राच्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता सुरु होण्यापूर्वी कार्यवाही का करण्यात आली नाही? याबाबतचे स्पष्टीकरण, व

(iii) प्रस्तावास विभागाचे सचिव/प्रधान सचिव यांची मान्यता आहे किंवा कसे ? इत्यादी.

३. सध्या राज्यात लागू असलेल्या आदर्श आचारसंहितेदरम्यान जर प्रशासकीय विभागाला एखाद्या प्रस्तावाला सूट मिळवायची असेल तर प्रस्ताव सादर करताना खालील बाबींचा समावेश असणे आवश्यक राहील :-

(i) राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक १४/१०/२०१६ रोजी आदर्श आचारसंहितेबाबतच्या आदेशाप्रमाणे छाननी केली असता, प्रशासकीय विभागाच्या स्तरावर कार्यवाही करता येत नसल्याने सूट मिळण्याबाबत,

(ii) दिनांक १९/१/२०१६ च्या पत्राप्रमाणे आदर्श आचारसंहिता सुरु होण्यापूर्वी कार्यवाही का करता आली नाही, याचा स्वयंस्पष्ट खुलासा , आणि

(iii) वरील प्रस्तावास विभागाचे सचिव /प्रधान सचिव यांची मान्यता आहे किंवा कसे

४. वरील ३ बाबींची पूर्तता झाली नसेल तर राज्य निवडणूक आयोगाकडून प्रस्तावांची दखल घेतली जाणार नाही.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( शेखर चन्ने )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
२. अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
३. सर्व विभागीय आयुक्त
४. सर्व महानगरपालिका आयुक्त
५. सर्व जिल्हाधिकारी
६. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
७. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायती
८. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
९. निवड नस्ती.